# माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना भारत सरकारच्या संस्कृत शिष्यवृत्या

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेच्या अभ्यासाकडे आकर्षित करण्यासाठी विद्यार्थ्यांना संस्कृत भाषेच्या गुणवत्ता शिष्यवृत्या दिल्या जातात. इयत्ता ८ वी मधील वार्षिक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयात प्राप्त केलेल्या गुणवत्तेवर इयत्ता ९ वी व १० वी आणि १० वी च्या गुणवत्तेवर इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. शालेय शिक्षण विभाग क्रमांक एसकेई १०९८/४२४०/(२२९/९८)माशि-८ दिनांक २० ऑक्टोंबर १९९८ अन्वये संस्कृत शिष्यवृत्तीच्या संचात व दरात सुधारणा करण्यात आली आहे. इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी रुपये १०० दरमहा व इयत्ता ११ वी १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी रुपये १२५ दरमहा शिष्यवृत्ती १९९८-९९ या वर्षापासून दिली जाते. इयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंत प्रत्येक इयत्तेला १०० संच या प्रमाणे एकूण ४०० संच शिष्यवृत्तीसाठी मंजूर आहेत. इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ही शिष्यवृत्ती मिळण्यास विद्यार्थ्यांस संस्कृत विषय घेणे आवश्यक असते. इयत्ता ९ वी व ११ वी मध्ये प्रथम मंजूरीच्या वेळी ही शिष्यवृत्ती दहा महिन्यासाठी दिली जाते.

| अ.क्रं. | योजनेचे नांव | लेखाशिर्ष |
|---|---|---|
| १ | माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना भारत सरकारच्या संसकृत शिष्यवृत्या (योजनेत्तर योजना) | २२०२ सर्वसाधारण शिक्षण ०५ भाषा विकास १०३ संस्कृत शिक्षण (००)(०१) माध्यमिक शाळांमधील भारत सरकारच्या शिष्यवृत्या (२२०२ १०६२) ३४ शिष्यवृत्या व विद्यावेतन |